# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.11.2025** **वार- मंगळवार**

---

**निवडणूक**

राज्यातल्या 246 नगर परिषदा आणि 42 नगर पंचायतींच्या सदस्य आणि थेट अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी येत्या 2 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या सर्व नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या कार्यक्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यात पुणे जिल्ह्यातल्या आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजुरी, जुन्नर, लोणावळा, राजगुरुनगर, तळेगांव दाभाडे, राजगुरुनगर, सासवड आणि शिरुर या नगर परिषदांचा तसंच मालेगांव बुद्रुक, मंचर, वडगांव या नगर पंचायतींचा समावेश आहे.

**मंत्रीमंडळ निर्णय**

राज्य मंत्रीमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पुणे जिल्ह्यात घोडनदी इथं जिल्हा न्यायालय, अतिरिक्त सत्र न्यायालय आणि वरीष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्याला मंजूरी देण्यात आली. बारामती इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यापकांची पाच पदं निर्माण करण्याला आणि त्यासाठीच्या तरतुदीलाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली.

**मंत्रीमंडळ बैठक**

पुणे मेट्रोच्या खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मेट्रो मार्गिकेअंतर्गत हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या दोन प्रकल्पांच्या अंमलबजावणीला आज मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही माहिती दिली.

**बिबटे**

पुणे जिल्ह्यातल्या मानवी वस्त्यांमधला बिबट्यांचा वाढता वावर आणि त्यांचा धोका लक्षात घेऊन बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी आणि मानव-बिबट संघर्षावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य शासनानं 11 कोटी 25 लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून जुन्नर वनविभागाच्या कार्यक्षेत्रात 20 विशेष बचाव पथकं नेमण्यात येतील. प्रत्येक पथकात प्रशिक्षित नेमबाज, शोधक, ट्रँक्युलायझिंग गन, बचाव वाहनं, अत्याधुनिक कॅमेरे आणि पिंजऱ्यांसह आवश्यक उपकरणांचा समावेश असेल.

**नवं बियाणं**

कृषी विभागामार्फत बियाण्यांच्या नवीन जातींना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा पिकासाठी ही योजना असून 45 हजार 985 हेक्टर

क्षेत्रावर पिकांच्या उत्पादकता वाढीचे प्रयोग राबवण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे कृषी संचालक अशोक किरनळ्ळी यांनी दिली. बियाणांच्या नव्या वाणांचा बियाणे साखळीतला समावेश टप्प्याटप्प्यानं वाढवणं आणि बियाणे बदल, दर आणि वाण बदल दर वाढवणं हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**<u>जलशुद्धीकरण केंद्र</u>**

पुणे महापालिकेच्या वडगाव जलशुद्धीकरण केंद्रासोबतच आता तिथं 125 एमएलडी क्षमतेचं नवीन जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठीच्या खर्चाला स्थायी समितीनं मान्यता दिली आहे. वडगाव जलशुद्धीकरण केंद्रातून कात्रजपासून पुढे महंमदवाडी, धनकवडीचा काही भाग, तसंच सिंहगड रस्ता परिसरात पाणीपुरवठा केला जातो.

**<u>रेडिओ</u>**

येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या महिलांच्या तुरुंगात सुरू करण्यात आलेल्या 'रेडिओ पर्वज' या रेडिओ वाहिनीचं उद्घाटन निवृत्त पोलीस अधिकारी किरण बेदी यांच्या हस्ते करण्यात आलं. व्हिजन फौंडेशनच्या सहकार्यानं ही वाहिनी सुरू करण्यात आली असून, यावरून सकारात्मक कार्यक्रम, गोष्टी, महिला सक्षमीकरण संदर्भातील कार्यक्रम प्रसारित केले जाणार आहेत.

**<u>थॅलेसेमिया</u>**

थॅलेसेमिया आजाराबाबतच्या जनजागृतीसाठी आणि प्रतिबंधात्मक तपासणीसाठी 'प्रिथम' हा उपक्रम महत्वपूर्ण ठरत असल्याची भावना सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे प्राचार्य डॉ. राजीव येरवडेकर यांनी व्यक्त केली. येरवडेकर यांच्या हस्ते 'प्रिथम' उपक्रमात सक्रिय योगदान देणाऱ्या रुग्णालयाच्या प्रतिनिधींचा मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

**<u>स्पर्धा</u>**

पुण्यात सुरू असलेल्या 'आयएफएससी एशियन किड्स क्लाइंबिंग अजिंक्यपद स्पर्धेत आज भारताला सहा पदकं मिळाली. 13 वर्षा खालील मुलांच्या वेग गटात आकाश सोरेन यानं तर ध्रुवी पाडवाल हिनं तेरा वर्षा खालील मुलींच्या गटात स्पीड प्रकारात सुवर्णपदक पटकावलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. कमाल 31 तर किमान 20 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही वातावरण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये.**

**नमस्कार.**